# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८९–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. तुकाराम संभाजी पाटील ,<br>मु. पो. ढवळी, ता. तासगांव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय क्र. २, तासगांव, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तुकाराम संभाजी पाटील, मु. पो. ढवळी, ता. तासगांव, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे नवीन शेतीपंपास वीज कनेक्शन मिळणेसाठी अर्ज केला व चलनाचे पैंसे पावती क्र. ४११९१३६ ने दि. ३०.४.२००९ ने भरले आहेत. तक्रारदार यांना आजतागायत विद्युत पुरवठा मिळाला नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ३०.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. कक्षाने कुठलाही आदेश न केल्याने प्रस्तुतची तक्रार दि. १६.४.२०१० रोजी मंचासमोर तक्रारदाराने दाखल केली. तक्रारदाराने चलनात लेबर चार्जेस रु. १००/– कशाचे भरुन घेतले आहेत हे स्पष्ट न झालेने ते व कपॅसिटर टेस्टींग फी रु. १००/– व्याजासह परत मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.५.२०१० च्या लेखी अहवालानुसार तक्रारदाराने दि. ५.१.२०१० रोजी टेस्ट रिपोर्ट दिला आहे. अंतर्गत कक्षाचा आदेश दि. ९.२.२०१० प्रमाणे तक्रारदाराने भरलेले कपॅसिटर टेस्टींग फी रु. १००/– व लेबर चार्जेस रु. १००/– असे रु. २००/– बिलातून समायोजित करण्यासाठी मे २०१० मध्ये बी–८० भरला आहे व सदरची रक्कम जून २०१० च्या बिलातून वजावट केली जाईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतची प्रकरणाची सुनावणी मंचासमोर घेण्यात आली असतां, श्री. खापरे उपस्थित, श्री. सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता, तासगांव २ उप विभाग उपस्थित. वि.प.चे अधिकारी श्री. सुर्यवंशी यांनी लेबर चार्जेस रु. १००/– हे कुठल्या प्रोव्हीजनखाली भरुन घेतले आहे या बाबत खुलासा करु शकले नाहीत. तसेच कपॅसिटर टेस्टींग फी रु. १००/– ग्राहकाकडून वसूल करणे हे कृती मानकातील तरतुदीच्या विरुध्द आहे, कारण मा.विद्युत नियामक आयोगाकडील केस क्र. ७०/२००५ मधील दि. ८.९.२००६ च्या आदेशानुसार वि.प.ने कपॅसिटर टेस्टींग फी ग्राहकाकडून वसूल करण्याची नाही. त्यामुळे तक्रारदार ग्राहकाकडून वसूल केलेली रक्कम वि.प.ने व्याजासह परत करण्याचे आदेश देणे योग्य होईल. तसेच लेबर चार्जेस रु. १००/– वसूल करतांना कुठलाही आधार नाही, त्यामुळे वि.प.ला या बाबत खुलासा करता आला नाही व नजरचुकीने भरुन घेतल्याचे प्रतिपादन केले. मा. आयोगाचे दि. ८.९.२००६ च्या आदेशाप्रमाणे वि.प.च्या मुख्य कार्यालयाने वेळोवेळी परिपत्रके काढून वसूल केलेली रक्कम परत करण्याचे आदेश दिले असतांना अशी रक्कम व्याजासह परत करणेचे आदेश देणे उचित होईल.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करणेत येत आहे.

२) वि.प.ने कपॅसिटर टेस्टींग फी रु. १००/– व लेबर चार्जेस रु. १००/– असे वसूल केलेले रु. २००/– तक्रारदार यांस १२% व्याजाने परत करावेत. सदर रकमेचे समायोजन बिलातून करण्यात यावे व त्याची पूर्तता केल्याचा अहवाल मंचास अहवाल द्यावा.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :